# यांच्यापासून सावधान !!!



महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ नुसार महाराष्ट्र राज्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांनी काम करणे कायद्याने बंधनकारक आहे. तसेच ह्याच कायद्याच्या आधारे मा. निबंधक व त्यांच्या हाताखालील कर्मचारी व शासनाने सुध्दा कायद्याला अधिन राहून काम करणे बंधनकारक आहे. ह्या कायद्याची चाकोरी ओलांडून जे काम करतील त्यांच्या विरूध्द कारवाई करण्याचे अधिकार संबंधितांना कायद्याने दिलेले आहेत. निबंधक म्हणजेच सहकारी संस्थांची नोंदणी करणारे अधिकारी व त्यांच्या हाताखालील कर्मचारी ह्याच कायद्याच्या आधारे सहकारी संस्थांना मार्गदर्शन करणे आणि / किंवा त्यांचेवर थेट कारवाई करणे हा अधिकार रजिस्ट्रारचा असल्यामुळे सहकारी संस्था नेहमी बचावाच्या भुमिकेत काम करताना दिसतात. प्रसंगी मर्यादा सोडून वागणारे दोन्ही बाजूचे लोक या सहकार चळवळीत मोठे प्रश्नचिन्ह उभे करणारे ठिकठिकाणी आढळतात.

दुर्दैवाने ह्या लोकशाही व्यवस्थेत आणि प्रामुख्याने सहकार खात्यातील अधिकाऱ्यांना महाराष्ट्र शासनाने देवू केलेला पगार व सवलती पुरेशा पडताना दिसत नाहीत. आणि त्याचाच परिणाम म्हणून सव्वा दोन लाख विविध प्रकारच्या सहकारी संस्था यांना आलेले अनुभव जर प्रत्येकाने निर्भिडपणे प्रतिज्ञापत्र करून जाहीर केले तर राज्यात एक भयानक व विचारापलीकडील कांड उभे राहील. प्रत्येक सहकारी संस्थेस ह्या व्यवस्थेने पैशासाठी त्या-त्या स्तरावर नाडलेले आहे. सहकारी संस्थांना कुठल्या-कुठल्या कारणास्तव कसे कसे नाडले जाते, व कुठल्या कायद्याच्या कलम व नियमाच्या आधारे त्रस्त केले जाते, त्याची उदाहरणादाखल माहिती खालिलप्रमाणे :

१. संस्था नोंदणी (कलम ९)
२. निबंधकाचा अधिकार (कलम ११)
३. संस्थेच्या उपविधीची सुधारणा (कलम १३)
४. संस्थेच्या नावात बदल करणे (कलम १५)
५. संस्थांचे एकत्रीकरण, हस्तांतरण, विभागणी किंवा रूपांतर (कलम १७)
६. कोणत्या व्यक्तीस सभासद होता येईल (कलम २२)
७. सभासदाचा मतदानाचा अधिकार (कलम २७)
८. पुस्तके इत्यादी पहाण्याचा अधिकार (कलम ३२)
९. सदस्यांना काढून टाकणे (कलम ३५)
१०. कर्जवाटप धोरणांचे नियमन (कलम ४४)
११. संस्थांच्या अधिकाऱ्यांविरूध्द अविश्वास प्रस्ताव (कलम ७३.१ ड)
१२. समितीच्या सदसत्वासाठी निर्हता (कलम ७३ फ फ)

१३. समितीचा सदस्य म्हणून पुर्ननियुक्तीस किंवा पुन्हा निवडून येण्यासाठी पात्रता (कलम ७३ फ फ फ)

१४. संस्थांच्या व्यवस्थापक, सचिव आणि इतर अधिकारी आणि विवक्षीत संस्थांसाठी असलेला मुख्य कार्यकारी अधिकारी व वित्त अधिकारी यांची अर्हता व नियुक्ती (कलम ७४)

१५. संस्था वगैरैंनी केलेली कृत्ये विवक्षीत दोषांमुळे विधीग्राह्य न होणे (कलम ७७)

१६. समितीची रचना करण्यासाठी सदस्यांची निवड करण्यास कसूर झाली असेल किंवा समितीने पदग्रहण केले नसेल त्याबाबतीत समितीच्या सदस्यांची, नवीन सदस्यांची किंवा प्रशासकाची नेमणूक (कलम ७७ अ)

१७. समितीस किंवा तिच्या सदस्यास दूर करण्याचा अधिकार (कलम ७८)

१८. आबंधन पार पाडण्यास फर्मावण्याचा निबंधकाचा अधिकार (कलम ७९)

१९. लोकहिताच्या दृष्टीने निर्देश देण्याचा शासनाचा अधिकार (कलम ७९ अ)

२०. विनिमय तयार करण्यासाठी निर्देश देण्याचे निबंधकाचे अधिकार (कलम ७९ अअ)

२१. एखाद्या सदस्याने आपल्या शेतकी उत्पादनाचा संस्करण संस्थेस पुरवठा केल्यास त्या सदस्यास काढून टाकण्याचा निबंधकाचा अधिकार (कलम ७९ ब)

२२. अभिलेख, वगैरे जप्त करण्याचा निबंधकाचा अधिकार (कलम ८०)

२३. लेखापरिक्षा (कलम ८१)

२४. हिशोबातील दोषांची सुधारणा (कलम ८२)

२५. निबंधकाने चौकशी करणे (कलम ८३)

२६. निबंधकाने, चौकशीत अथवा तपासणीत उघडकीस आलेले दोष संस्थेच्या निर्दशनास आणणे. (कलम ८७)

२७. अपराधी प्रवर्तक वगैरैंविरूध्द नुकसानी आकारण्याचा निबंधकाचा अधिकार (कलम ८८)

२८. संस्थेच्या कामकाजाचे निरीक्षण करण्याचा अधिकार (कलम ८९ अ)

२९. विवक्षित सहकारी संस्थेची देय थकबाकी जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसुल करणे. (कलम १०१)

३०. समापन (अवसायन) (कलम १०२)

३१. परिसमापकाची नियुक्ती (कलम १०३)

३२. समापनाच्या आदेशाविरूध्द अपिल (कलम १०४)

३३. संस्थेचे व्यवहार बंद करण्याचा किंवा ती विघटीत करण्याच्या बाबतीत दावा आणण्यास प्रतिबंध. (कलम १०७)

३४. शिल्लक मालमत्तेची विल्हेवाट (कलम ११०)

३५. विमा उतरविलेल्या सहकारी संस्थेचे समापन करणे, तिची पुनर्रचना करणे, तिची समिती निष्प्रभावित करणे वगैरे संबंधीचा आदेश भारतीय रिझर्व्ह बँकेची मंजूरी किंवा मागणी या वाचून

न देणे. (कलम ११० अ)

३६. निबंधकांनी दिलेले प्रमाणपत्र सादर केल्यावर कर्जाची वसुली (कलम १३७)

३७. जिल्हाधिकाऱ्याकडून केल्या जाणाऱ्या वसुलीची पध्दत (कलम १३८)

३८. निवडणुकांचे संचालन (कलम १४४ क)

३९. निवडणुकांच्या संचालनाचा खर्च (कलम १४४ ड)

४०. सदस्यत्वाकरिता अनर्हता (१४४ ई)

४१. भ्रष्टाचार (कलम १४४ आय)

४२. मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राजवळ प्रचार करण्यास मनाई (कलम १४४ ल)

४३. मतदान केंद्रावर गैरवर्तणूक केल्याबद्दल शास्ती (कलम १४४ न)

४४. निवडणुकांत बेकायदेशीर रीतीने वाहने भाड्याने घेणे किंवा मिळविणे याबद्दल शास्ती (कलम १४४ ओ)

४४. अपिले (कलम १५२)

४६. राज्य शासनाचे आणि निबंधकाचे पुनर्रक्षणविषयक अधिकार (कलम १५४)

४७. जप्ती आणून व मालमत्तेची विक्री करून रकमा वसूल करण्याचे रजिस्ट्रारचे अधिकार (कलम १५६)

४८. राज्याबाहेरील संस्थांच्या शाखा वगैरे (कलम १५९)

वरील सर्व अधिनियम व त्याला संबंधीत असणारे नियम यांचा आधार घेऊन सहकारी संस्थांच्या आर्थिक शोषणासाठी सहकार खात्याच्या त्या-त्या स्तरावर अलीकडच्या काळात नियमीतपणे कायदा असल्यासारखा खंडणी वसूल करण्याचा प्रकार सर्रास होताना दिसतो. प्रामुख्याने ठेवी जमा करणाऱ्या व कर्ज वाटप करणाऱ्या वित्तीय सहकारी संस्था व गृहनिर्माण सहकारी संस्था हे सहकार खात्यातील संबंधीतांचे प्रथम व अंतिम लक्ष आहे. साखर कारखाने, सुतगिरण्या, प्रोसेसिंग युनिट ह्या संस्था तर एक प्रकारचे संबंधितांसाठी मालकी हक्काचे कुरण असल्यासारखेच आहे. सहकारी संस्था चालविणारे कार्यकर्ते केव्हा चूक करतात याची वाट पाहणाऱ्यांची व बगळ्यासारखे टपून असणाऱ्यांची संख्या सहकार खात्यात ९९ टक्यांपेक्षा जास्त आहे. परंतु मार्गदर्शन ही आपली वैधानिक जबाबदारी नाही किंवा अज्ञान व अजाणतेपणे केलेली कृती दुरूस्तीस पात्र नाही ह्या अविर्भावाने ही सहकारी यंत्रणा सहकारी संस्थांना नियमितपणे ओरबडत असतानाच दिसतात. अर्धन्यायिक व्यवस्था ह्यातून बिलकूल अलिप्त नाही आणि हेच सहकार चळवळीवरील अन्यायाचे मुळ स्थान आहे.

कुठल्याही विषयाचा निकाल बाजूने देताना किंवा विरोधात देताना दोन्हीही बाजुंनी संबंधितानां आर्थिकदृष्या नाडण्याची ही एकमेव बाजारपेठ संबंधितांनी करून ठेवलेली आहे. आणि ही **दृष्ट** व्यवस्था मुळापासून उखडून काढण्यासाठी त्या दिशेने आपली पावले सक्षमपणे न घाबरता उचलण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी एकत्रीत समुदायाने बंडच उभारले पाहिजे. व परिणामाची पर्वा न करता इतके दिवस दडलेले कटू सत्य जगजाहीर केले पाहिजे. आणि त्यासाठी येणारा ३१ मार्च याला आपण सुवर्णसंधी समजूया आणि त्याच दिशेने चोख व्यवहार करण्यासाठी कायदा व नियम यांचे पालन करून सडेतोड जबाब आपण कृतीतून

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**